निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
रविवार
०१ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३६३ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# महायुद्धाचा भडका!

## इस्त्रायल-अमेरिकेचा इराणवर भीषण हल्ला; प्रत्युत्तरात इराणने डागली ४०० क्षेपणास्त्रे



**आत्ताच एक्सप्रेस**

**तेहरान/तेल अवीव/वृत्तसेवा**/मध्य पूर्वेमध्ये अखेर युद्धाचा वणवा पेटला आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे इराणच्या राजधानीसह अनेक प्रमुख शहरांवर भीषण हल्ले चढवले आहेत. या हल्ल्याने संपूर्ण जगाला हादरवून सोडले असून, इराणनेही अत्यंत आक्रमक पवित्रा घेत इस्त्रायलवर ४०० हून अधिक क्षेपणास्त्रांचा वर्षाव केला आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी यांना तातडीने अज्ञात आणि सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे.

**लक्ष्य:** इराणची सत्ताकेंद्रे आणि अणू प्रकल्प इस्त्रायलने अत्यंत नियोजित पद्धतीने इराणच्या कणा मोडण्यासाठी थेट महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य केले आहे.

**गुप्तचर आणि संरक्षण मंत्रालय:** इराणच्या सुरक्षा यंत्रणेचे मुख्य तळ उद्ध्वस्त करण्यात आले आहेत.

**सर्वोच्च नेत्यांचे कार्यालय:** थेट खमेनी यांच्या कार्यालयावर हल्ला करून इस्त्रायलने इराणला मोठा इशारा दिला आहे.

**अणू ऊर्जा संघटना:** इराणच्या अणू प्रकल्पांना लक्ष्य करून त्यांच्या भविष्यातील घातक योजनांना लगाम घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**इराणचा महाप्रलयंकारी पलटवार: अमेरिकन तळांवरही हल्ले**

इराणने केवळ इस्त्रायलच नव्हे, तर खाडी देशांतील अमेरिकेच्या लष्करी तळांनाही लक्ष्य केले आहे. इराणच्या 'फार्स' वृत्तसंस्थेनुसार खालील तळांवर क्षेपणास्त्रे डागण्यात आली:

**पुढील वृत्त पान २ वर..**

# राज्यातील विमानतळांची विकासकामे कालबद्ध गतीने पूर्ण करावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ आशियातील सर्वात मोठे प्रस्तावित वाढवण बंदर राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी निर्णायक ठरणार आहे. या बंदराला रस्ता, रेल्वे आणि वायुमार्गाने प्रभावीपणे जोडण्यासाठी समन्वयित पावले उचलली जात आहेत.

वाढवण व विरार परिसरात नवीन ग्रीनफिल्ड विमानतळ विकसित करण्यासाठी तातडीने जागा निश्चिती करण्यात यावी, तसेच राज्यातील विविध विमानतळांच्या विकासकामांना कालबद्ध गती देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

विधिमंडळातील समिती कक्षात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणच्या संचालक मंडळाची ९३ वी बैठक पार पडली. बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, प्राधिकरणाच्या व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष स्वाती पांडेय, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. विजय सिंघल तसेच मिहानचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. विपीन विटणकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गडचिरोली जिल्हा देशातील महत्त्वपूर्ण स्टील उद्योग केंद्र म्हणून विकसित होत असून, या औद्योगिक वाढीला चालना देण्यासाठी तेथे लवकरच ग्रीनफिल्ड विमानतळ उभारण्यात येणार आहे.

औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे वाढती वाहतूक आणि लॉजिस्टिक गरजा लक्षात घेता आधुनिक विमानतळ सुविधा आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

बैठकीत नांदेड, सिंधुदुर्ग आणि नागपूर येथील कार्यरत विमानतळांच्या सुविधा विस्तार व आधुनिकीकरणाचा आढावा घेण्यात आला. प्राधिकरणाच्या वतीने राज्यातील नऊ विमानतळांच्या विकासकामांबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

**मिहान विकासासाठी ५९७ कोटींची मंजुरी; २९७ कोटी वितरित**

मिहान येथे अनेक उद्योग व प्रकल्प कार्यान्वित झाले असून, पतंजली आयुर्वेदचाही प्रकल्प सुरू झाला आहे. तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर, कमर्शियल कॉम्प्लेक्स, महाराष्ट्र अ‍ॅग्रो डेव्हलपमेंट कंपनी, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अ‍ॅप्लिकेशन सेंटर, सेझबाह्य क्षेत्रातील हेल्थकेअर सुविधा, कार्गो हब आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी ई-व्ही चार्जिंग स्टेशन यांसारख्या प्रकल्पांची माहिती यावेळी देण्यात आली.

मिहानच्या सर्वांगीण विकासासाठी ५९७ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी २९७ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. १२ कोटी ३८ लाख रुपये खर्चाचा ३९ एमएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया (एसटीपी) प्रकल्प उभारण्यात येत आहे.

शिवणगाव आणि वित्तुबाबानगर परिसरातील पायाभूत सुविधांसाठी ९९ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील विमानतळ व औद्योगिक पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणामुळे गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळेल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.




# खारघर येथे हिंद-दी-चादर शहिदी समागमात भक्ती, सेवा आणि एकात्मतेचा संगम

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी मुंबई /प्रतिनिधी**/खारघर नवी मुंबई येथे 'हिंद-दी-चादर' अंतर्गत श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी वर्षानिमित्त आयोजित समागमात भक्ती, सेवा आणि सामाजिक एकात्मतेचे अद्वितीय वातावरण अनुभवायला मिळत आहे. देशभरातून आलेल्या भाविकांच्या उपस्थितीमुळे परिसर पूर्णपणे आध्यात्मिक रंगात न्हाऊन निघाला आहे.

समागमस्थळी अखंड कीर्तन सुरू असून वाहे गुरु आणि बोले सो निहाल, सत श्री अकाल च्या जयघोषाने वातावरण भारावून गेले आहे. रागी जत्थेदारांच्या कीर्तनात भाविक भावनिकरित्या तल्लीन झालेले दिसत होते. विविध ठिकाणी लावलेल्या एलईडी स्क्रीनमुळे प्रत्येक भाविकाला कीर्तनाचा लाभ घेता आला.

'विरासत-ए-सीख' या प्रदर्शनातून शीख समाजाचा इतिहास, शौर्यगाथा आणि परंपरा सचित्र स्वरूपात मांडण्यात आल्या आहेत. शीख योद्ध्यांनी वापरलेली शस्त्रे आणि ऐतिहासिक माहिती पाहण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे.

कार्यक्रमस्थळी सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड लंगर सेवा सुरू असून सर्व धर्मीयांना प्रेमपूर्वक भोजन दिले जात आहे. स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने वाढप, स्वच्छता व व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली आहे. हजारो स्वयंसेवकांच्या सहभागातून 'सेवा हीच खरी श्रद्धा' हा संदेश दिला जात आहे.

समागमात मुख्यमंत्री सहायता निधीच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत विविध तपासण्या व औषधोपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. डोळ्यांची तपासणी करून मोफत देवाभाऊ चष्मे वाहनातून चष्मे वितरित करण्याची सोयही करण्यात आली आहे.सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे वातावरण अधिक रंगतदार झाले आहे. बंजारा व लबाना समाजाच्या महिलांनी पारंपरिक नृत्य सादर करून सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडविले.

शिखांची पारंपरिक मार्शल आर्टची प्रात्यक्षिकेही पाहायला मिळाली. ३३ पार्किंग स्थळे, मोफत पिकअप-ड्रॉप सुविधा, कडक वाहतूक नियोजन, पोलीस व अग्निशामक दलाचा बंदोबस्त यामुळे कार्यक्रम सुरळीत पार पडत आहे. स्वच्छता रथ व कचरा संकलन व्यवस्था सतत कार्यरत असल्याने परिसर स्वच्छ ठेवण्यात आला आहे.

# माणुसकीचा अंत की नियतीचा खेळ?

## गडचिरोलीत बँकेच्या आडमुठेपणामुळे वृद्धेचा मृत्यू, तर भंडाऱ्यात पती-पत्नीचा एकत्र अंत्यविधी

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/प्रतिनिधी**/ विदर्भातील दोन वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून माणुसकीला चटका लावणारी आणि डोळ्यांत पाणी आणणारी दोन टोकाची वृत्ते समोर आली आहेत. गडचिरोली जिल्ह्यात बँकेच्या अमानवीय धोरणामुळे एका वृद्ध महिलेला कोमात असतानाही बँकेत यावे लागले आणि अखेर त्यांचा मृत्यू झाला. तर दुसरीकडे, भंडारा जिल्ह्यात एका वृद्ध दांपत्याने मृत्यूतही एकमेकांची साथ न सोडल्याने संपूर्ण गाव हळहळले.

**गडचिरोली: कोमात असलेल्या वृद्धेला बँकेत खेचले; उपचाराअभावी मृत्यू**

गडचिरोली जिल्ह्यातील पोर्ला गावातून बँक प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचा एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.काटली येथील ७० वर्षीय शांताबाई मानकर या गेल्या काही दिवसांपासून कोमात होत्या. त्यांच्यावर उपचार करण्यासाठी कुटुंबाला पैशांची अत्यंत गरज होती. शांताबाईंच्या खात्यावर पैसे होते, ते काढण्यासाठी त्यांची मुलगी आणि जावई बँकेत गेले. त्यांनी शांताबाईंच्या अंगठ्याचा ठसा नेला होता, परंतु बँक व्यवस्थापनाने पैसे देण्यास नकार दिला.

सक्तीची उपस्थिती: बँकेने खातेदाराला प्रत्यक्ष हजर करा, त्याशिवाय पैसे मिळणार नाहीत अशी कठोर भूमिका घेतली.नियम डावलले: नियमानुसार, गंभीर आजारी व्यक्तीसाठी मेडिकल सर्टिफिकेट ग्राह्य धरणे किंवा बँकेच्या कर्मचाऱ्याने घरी जाऊन पडताळणी करणे अपेक्षित होते. मात्र, तसे न करता वृद्धेला बँकेत आणण्यास भाग पाडले गेले.दुर्दैवी अंत: कोमात असलेल्या शांताबाईंना स्ट्रेचरवरून बँकेत आणण्यात आले. या धावपळीत आणि मानसिक त्रासात अखेर आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.ग्रामस्थांचा रोष: या घटनेनंतर पोर्ला गावात संतापाची लाट असून, संबंधित बँक व्यवस्थापकावर कठोर कारवाई करण्याची मागणी गावकरी करत आहेत.एकीकडे माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली असताना, भंडारा जिल्ह्याच्या तुमसर तालुक्यातील सोरना गावातून निस्सीम प्रेमाची एक हृदयस्पर्शी कथा समोर आली आहे.सोरना येथील लखाराम शहारे (८६) यांचे रात्री ७ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. पतीच्या निधनाचे वृत्त समजताच त्यांच्या ८० वर्षीय पत्नी जैतुराबाई यांना मोठा धक्का बसला. ज्या पतीसोबत ६ दशकांहून अधिक काळ संसार केला, त्यांच्या विरहाचे दुःख त्या सहन करू शकल्या नाहीत.

पतीच्या निधनानंतर अवघ्या काही तासांतच, पहाटे ३ वाजता जैतुराबाईंनीही अखेरचा श्वास घेतला. मरणापर्यंत सोबत राहू हे वचन या दांपत्याने अक्षरशः खरं करून दाखवलं. सकाळी जेव्हा अंत्ययात्रा निघाली, तेव्हा संपूर्ण गाव गहिवरून आले होते.

# कन्नड नगरीत मोकाट जनावरांचा हैदोस; नगरपरिषद प्रशासनाचे 'झोपेचे सोंग', नागरिकांचा जीव टांगणीला!

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड शहरात गेल्या अनेक दिवसांपासून मोकाट जनावरांचा सुळसुळाट प्रचंड वाढला असून, यामुळे सामान्य नागरिकांना जीव मुठीत धरून वावरावे लागत आहे. शहरातील मुख्य रस्ते आणि वर्दळीच्या ठिकाणी जनावरांनी ठिय्या मांडल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे, मात्र नगरपरिषद प्रशासन या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संतापलेले नागरिक करत आहेत.

मुख्य चौकात जनावरांची दहशत

शहरातील बस स्थानक परिसर, पिशोर नाका, कॉलेज गेट, हिवरखेडा नाका, शनि मंदिर परिसर आणि स्वतः नगरपरिषद चौक यांसारख्या अतिशय वर्दळीच्या ठिकाणी मोकाट जनावरांनी दहशत निर्माण केली आहे. रस्त्याच्या मधोमध उभ्या राहणाऱ्या जनावरांमुळे वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. विशेषतः मोकाट वळू केव्हा कोणावर हल्ला करतील याचा नेम राहिलेला नाही. ग्रामीण भागातून कामासाठी येणाऱ्या नागरिकांना आणि पादचाऱ्यांना या परिस्थितीमुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.



**प्रशासनाची उदासीनता आणि सुस्त कारभार**

एकीकडे जनावरांची दहशत वाढत असताना, दुसरीकडे नगरपरिषदेची प्रशासकीय यंत्रणा मात्र हातावर हात धरून बसली आहे. वारंवार तक्रारी करूनही या जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. प्रशासनाच्या या झोपेच्या सोंगामुळे कन्नडवासीयांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. एखादा मोठा अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा सवाल आता विचारला जात आहे.

नवनिर्वाचित नगराध्यक्षांकडून अपेक्षा

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. फरीन अब्दुल जावेद शेख यांनी आपल्या पदाची सूत्रे हाती घेतली आहेत. शहराच्या विकासाच्या गप्पा मारणाऱ्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आणि नगराध्यक्षांनी या जीवघेण्या प्रश्नाकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

आपल्या सहकारी पदाधिकाऱ्यांसह त्यांनी या मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करून कन्नडवासीयांची या संकटातून सुटका करावी, हीच जनतेची माफक अपेक्षा आहे.

प्रशासनाने तातडीने पावले न उचलल्यास आगामी काळात नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, अशी चिन्हे दिसत आहेत.

# कायद्याचे भय संपले की संयमाचा बांध फुटतो?

छत्रपती संभाजीनगरमधील पैठण तालुक्यात शनिवारी रात्री जे घडले, ते राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेच्या चिंधड्या उडवणारे आहे. मद्यधुंद तरुणांनी एका निष्पाप गावकऱ्याला मारहाण करणे आणि चक्क हवेत गोळीबार करणे, ही मग्रुरी येते कुठून? 'कुलस्वामिनी कला केंद्रा'बाहेर घडलेला हा थरार केवळ एका रात्रीचा गोंधळ नसून, ग्रामीण भागात फोफावत चाललेल्या अवैध धंद्यांचे आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचे भयावह वास्तव मांडणारा आहे.

मग्रुरीची 'हवेतली गोळी' आणि पोलिसांचा धाक

रस्त्याने जाणाऱ्या तरुणाला अडवून त्याला बेदम मारहाण करणे आणि त्यानंतर खिशातून बंदूक काढून गोळीबार करणे, ही कृती हेच दर्शवते की, गुन्हेगारांना पोलिसांचा कसलाही धाक उरलेला नाही. शहराच्या हद्दीत किंवा ग्रामीण भागात जेव्हा अवैध दारू आणि कला केंद्रांच्या नावाखाली अनैतिक प्रकार चालतात, तेव्हा तिथे अशा भाईगिरीचा जन्म होतो. जर गुन्हेगारांना खाकी वर्दीची भीती असती, तर त्यांनी सार्वजनिक ठिकाणी बंदूक उगारण्याचे धाडस केले नसते.

जेव्हा कायदा हातात घेतला जातो...

३०० गावकऱ्यांचा जमाव एकत्र येऊन कला केंद्रावर तुटून पडतो, ही घटना अत्यंत गंभीर आहे. लोकशाहीत कायदा हातात घेणे समर्थनीय नाहीच, पण जनतेचा संयम का सुटला? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. जेव्हा पोलीस प्रशासनाकडून गुन्हेगारांवर वेळेत वचक बसवला जात नाही, तेव्हा जनता स्वतःचा न्याय स्वतः करण्याच्या भूमिकेत उतरते.

तोडफोड आणि हिंसा: फर्निचर, सीसीटीव्ही, वाहने यांची झालेली तोडफोड ही त्या संतापाची परिणती आहे जो अनेक दिवसांपासून अशा कला केंद्रांच्या त्रासामुळे गावकऱ्यांच्या मनात साचला असावा.

प्रशासनाला जळजळीत प्रश्न

१. अवैध हत्यारे आली कुठून? साध्या मारहाणीत थेट बंदूक काढून गोळीबार करण्यापर्यंत मजल जाते, याचा अर्थ परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध शस्त्रे फिरत आहेत.

२. रात्री ११ चे नियम कुठे गेले? कला केंद्रात डान्स कार्यक्रम आणि मद्यधुंद तरुणांचा धिंगाणा सुरू असताना स्थानिक पोलीस गस्त काय करत होती?

३. गावकऱ्यांचा सुरक्षा कुणाकडे? रजापूरसारख्या गावातील सामान्य माणसाने रात्री रस्त्यावरून चालताना जीव मुठीत धरून चालायचे का?

पाचोड पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली असली, तरी ही केवळ 'वरवरची शांतता' आहे. जोपर्यंत गोळीबार करणाऱ्या त्या मग्रूर तरुणांवर आणि अशा गोंधळाला खतपाणी घालणाऱ्या कला केंद्र चालकांवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत जनतेचा रोष शमणार नाही. प्रशासनाने आता तरी जागे व्हावे, अन्यथा 'जमावाचा न्याय' (Mob Justice) ही प्रवृत्ती समाजासाठी अधिक घातक ठरेल.

आता वेळ केवळ गुन्हे दाखल करण्याची नाही, तर गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा दरारा निर्माण करण्याची आहे!

# होळी आणि धूलिवंदन : रंगांचा उत्सव की सामाजिक आत्मपरीक्षणाची संधी?

फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला साजरा होणारा होळीचा सण हा केवळ रंगांचा उत्सव नाही, तर तो भारतीय संस्कृतीच्या अंत:करणातील आनंद, बंधुभाव आणि परिवर्तनाचा संदेश घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी साजरे होणारे धूलिवंदन म्हणजे रंगांच्या उधळणीतून नात्यांना नवसंजीवनी देण्याचा दिवस असतो. गावोगावी पेटणाऱ्या होळीच्या ज्वाला आणि सकाळी उधळले जाणारे रंग यामागे एक सखोल तात्त्विक अर्थ दडलेला आहे, ते म्हणजे वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगुलपणाचा स्वीकार. होळीचा उगम पौराणिक कथांशी जोडलेला आहे. दैत्यराज हिरण्यकश्यपू आणि त्याची बहीण होलिका यांची कथा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. भक्त प्रल्हादाच्या निश्चयी श्रद्धेवर मात करण्यासाठी होलिकेने अग्नीत प्रवेश केला; परंतु सत्य, श्रद्धा आणि भक्तीच्या बळावर प्रल्हाद वाचला आणि होलिका भस्मसात झाली. या कथेतून मिळणारा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. अहंकार, अन्याय आणि अत्याचाराचा अंत निश्चित असतो. परंतु प्रश्न असा आहे की, आपण केवळ होळी पेटवतो की खरोखरच आपल्या मनातील 'होलिका' जाळतो? आजच्या समाजात असूया, मत्सर, द्वेष, राजकीय स्वार्थ, धार्मिक ध्रुवीकरण यांसारख्या प्रवृत्ती वाढताना दिसतात. अशा वेळी होळी ही केवळ विधी न राहता आत्मपरीक्षणाची संधी ठरायला हवी.

धूलिवंदन म्हणजे रंगांचा खेळ. सकाळी अंगावर रंग उधळत आपण एकमेकांना बुरा न मानो होली है असे म्हणत हसतखेळत क्षमा मागतो, क्षमा देतो. समाजातील भेद, जात, धर्म, वर्ग, श्रीमंती-गरीबी क्षणभरासाठी का होईना, विरघळतात. रंगांचे वैशिष्ट्य असे की ते प्रत्येकाला सारखेच रंगवतात. पांढरा कुर्ता असो वा महागडी साडी, रंग लागला की सगळे समान! आजच्या काळात ही समता टिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. सोशल मीडियाच्या आभासी जगात आपण 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स'च्या मोजपट्टीवर नाती मोजतो. प्रत्यक्ष भेटीगाठी कमी होत चालल्या आहेत. धूलिवंदन हा सण आपल्याला सांगतो माणसांमध्ये मिसळा, मनमोकळे हसा, जुने राग विसरा. अलीकडच्या काळात होळीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लाकूड जाळले जाते. रासायनिक रंगांचा वापर वाढतो.

त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते, त्वचेच्या तक्रारी वाढतात. सण साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे. शेतीप्रधान देशात फाल्गुन हा हंगाम संपण्याचा आणि नवीन पीक येण्याचा काळ आहे. होळी ही निसर्गाच्या चक्राशी जोडलेली परंपरा आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक होळी, नैसर्गिक रंगांचा वापर आणि पाण्याची बचत हे आजचे 'नवे संस्कार' ठरायला हवेत.महाराष्ट्रात धूलिवंदनानंतर रंगपंचमीही मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.

नागपूर सारख्या शहरात तर मित्रपरिवार, कुटुंबीय आणि समाजातील विविध घटक एकत्र येऊन हा सण आनंदाने साजरा करतात. परंतु काही ठिकाणी रंगांच्या नावाखाली जबरदस्ती, मद्यपान, महिलांवर गैरवर्तन यासारखे प्रकारही घडतात. हे चित्र चिंताजनक आहे. सणांचा आत्मा हा आनंद आणि सन्मानात असतो; दडपशाहीत नाही. रंग लावला म्हणजे अधिकार मिळाला अशी मानसिकता बदलायला हवी. धूलिवंदन हे 'सन्मानाने रंगवणे' शिकवते, 'जबरदस्तीने रंग चोपडणे' नव्हे. भारतीय समाजजीवनात सणांचे राजकारणाशीही नाते आहे. काही वेळा सणांच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होतात. होळीचा खरा संदेश मात्र एकात्मतेचा आहे. विविधतेत एकता ही भारताची ताकद आहे. होळी आपल्याला सांगते मतभेद असू द्या, पण मनभेद नकोत.

आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शिक्षण-आरोग्याच्या समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न उभे आहेत. होळीच्या ज्वालेसमोर उभे राहून आपण या प्रश्नांवरही विचार करायला हवा. केवळ व्यक्तीगत राग-द्वेष जाळून चालणार नाही; समाजातील अन्याय, विषमता आणि भ्रष्टाचार यांनाही जाळण्याचा निर्धार हवा. इतिहासात होळीच्या उत्सवात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर राहिला आहे.

लोकगीते, फुगड्या, सामूहिक नृत्य यांतून स्त्रियांनी आपला आनंद व्यक्त केला. आजच्या काळात स्त्री-पुरुष समानतेचा संदेशही या सणातून द्यायला हवा. महिलांना सुरक्षित आणि सन्मानाने सण साजरा करता यावा, ही समाजाची जबाबदारी आहे. होळीच्या निमित्ताने बाजारपेठा गजबजतात. रंग, पिचकाऱ्या, मिठाई, पारंपरिक पदार्थ या सर्वांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गावरान पुरणपोळी, करंजी, गूळ-पोहे यांचा सुगंध घराघरांत दरवळतो. सण हा अर्थचक्रालाही गती देतो. मात्र, खर्चाच्या स्पर्धेत अडकून मूळ आनंद हरवू नये, याची जाणीव ठेवायला हवी.

होळी आणि धूलिवंदन हे नात्यांच्या पुनर्बांधणीचे दिवस आहेत. वर्षभरात गैरसमज होतात, कटुता वाढते. पण या सणाच्या निमित्ताने आपण एकमेकांना भेटतो, मिठी मारतो, रंगपंचमीच्या शुभेच्छा देतो आणि नवे वर्ष नव्या उत्साहाने सुरू करतो. ज्या समाजात संवाद थांबतो, तिथे तणाव वाढतो. होळीचा रंग म्हणजे संवादाची सुरुवात. धूलिवंदन म्हणजे अहंकाराची धूळ झटकून टाकणे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतर्मनातील होळी. आपल्या मनात साठलेले राग, भीती, न्यूनगंड, असुरक्षितता या सर्वांना जाळणे आवश्यक आहे. होळीची ज्वाला आपल्याला धैर्य देते; धूलिवंदनाचा रंग आपल्याला आनंद देतो. आजच्या वेगवान, तणावपूर्ण जीवनात आपण आनंद साजरा करायलाही विसरलो आहोत. होळी हा सण सांगतो, जगणे म्हणजे केवळ स्पर्धा नव्हे, तर उत्सवही आहे.

होळी आणि धूलिवंदन हे केवळ परंपरा नाहीत; ते जीवनदृष्टी आहेत. अन्यायावर न्यायाचा विजय, द्वेषावर प्रेमाचा विजय, निराशेवर आशेचा विजय हा संदेश या सणात दडलेला आहे. यावर्षी होळी पेटवताना आपण केवळ लाकूड जाळू नये; आपल्या मनातील कटुता जाळू या. धूलिवंदन साजरे करताना केवळ रंग उधळू नये; प्रेम, सन्मान आणि समतेचे रंग उधळू या. रंगांच्या या सणात प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाची उधळण होवो, समाजात सौहार्द फुलो आणि आपल्या अंत:करणातील होलिका भस्मसात होवो, हीच अपेक्षा. सर्वांना होळी आणि धूलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**
----------------

# संविधान हा केवळ दस्तऐवज नव्हे, तर जिवंत तत्त्वज्ञान; डॉ. अमित कुमार यांचे प्रतिपादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/भारतीय संविधान हा केवळ कागदावरचा निर्जीव कायदा नसून ते जीवनाचे एक प्रवाही वाहन आहे. संविधानाचा आत्मा प्रत्येक युगाच्या गरजेनुसार बदलत राहतो. संविधानाने दिलेल्या अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे, असे प्रतिपादन नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, मुंबई येथील प्रो. डॉ. अमित कुमार यांनी केले.

**जालन्यात 'भारतीय संविधानाची ७५ वर्षे: संधी आणि आव्हाने' या विषयावर राष्ट्रीय परिषद संपन्न; ५४ शोधनिबंधांचे सादरीकरण**

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी आयोजित 'भारतीय संविधानाची ७५ वर्षे : संधी आणि आव्हाने' या विषयावरील एक दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेत ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

संविधानाची प्रवाहीता आणि घटनात्मक नैतिकता

डॉ. अमित कुमार यांनी आपल्या भाषणात संविधानाच्या प्रगल्भतेवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, संविधान 'स्टॅटिक' (स्थिर) नाही. ७५ वर्षांपूर्वी जे लिहिले गेले, त्याचा अर्थ काळाप्रमाणे विस्तारत आहे. त्यांनी पुट्टास्वामी केस (गोपनीयतेचा अधिकार), 'राईट टू हेल्थ' आणि समलैंगिकांच्या अधिकारांचा दाखला देत स्पष्ट केले की, संविधान उपेक्षितांना ताकद देते.

अनेकदा समाजाला काही गोष्टी मान्य नसतात, पण घटनात्मक नैतिकता सर्वांना समान अधिकार देते. व्यक्ती किंवा पद महत्त्वाचे नसून, संस्था आणि सिद्धांत सर्वोच्च आहेत, असेही त्यांनी ठामपणे मांडले.

या राष्ट्रीय परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे यात सामाजिक शास्त्रातील विविध विषयांवर तब्बल ५४ शोधनिबंध सादर करण्यात आले.

यामध्ये भूगोल, अर्थशास्त्र, लोकप्रशासन,इतिहास, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांचा समावेश होता. या शोधनिबंधांच्या माध्यमातून संविधानाच्या विविध पैलूंवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

परिषदेचे उद्घाटन भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा माजी आमदार डॉ. नारायणराव मुंडे यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. मुंडे म्हणाले की, भारतीय संविधानाचे मूळ आपल्या सांस्कृतिक वारशात आहे. रामायण, महाभारत आणि संतांनी लिहिलेले अभंग हे एक प्रकारे लोककल्याणकारी संविधानच आहे.

व्यासपीठावरील प्रमुख उपस्थिती प्रा. सत्संग मुंडे



उपाध्यक्ष, भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,सुघोष मुंडे सचिव, भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,विषय तज्ज्ञ: व्यंकटेश लांब, डॉ. कालिदास भांगे, डॉ. सीमा निकाळजे आणि डॉ. दादासाहेब गजहंस.प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी प्रास्ताविकात संविधानाने दिलेल्या सहा मूलभूत स्वातंत्र्यांचे महत्त्व विषद केले.

समाजवादाचा प्रभाव असलेल्या या राज्यघटनेमुळेच देशातील लोकशाही अधिक बळकट झाली असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय डॉ. सविता मुंडे यांनी करून दिला. शेवटी डॉ. सचिन जयस्वाल यांनी आभार मानले.

या परिषदेसाठी जालन्यासह राज्यभरातून मोठ्या संख्येने प्राध्यापक आणि संशोधक उपस्थित होते.

# पर्यावरण पूरक होळी साजरी करावी

देशात होळी हा सण प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या पध्दतीने सर्वत्र साजरा करण्यात येतो.यामुळे आपल्याला सर्वत्र होळी मिलन दिसून येते.महाराष्ट्रात मराठी माणसांसाठी होळीचे आगळीवेगळे महत्त्व आहे.होळी म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा सण. ज्याप्रमाणे इंग्रजी वर्षानुसार डिसेंबर हा शेवटचा महिना असतो त्याचप्रमाणे होळीचा फाल्गुन महिना मराठी माणसासाठी शेवटचा महिना आहे. नवीन वर्षाची सुरुवात चैत्र महिन्यापासुन होते म्हणजेच गुडी पाडवा. त्यामुळे जुने वर्ष होळी व धुलीवंदनाच्या रूपात साजरे करून जुन्या वर्षाला निरोप दिला जातो आणि गुढीपाडव्याच्या निमित्ताने नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.बदलत्या काळानुसार होळी व धुलीवंदन साजरे करतांना पर्यावरण व निसर्गाचे संतुलन जोपासने अत्यंत गरजेचे आहे.त्याच अनुषंगाने कोणत्याही धर्माचे सण असो त्यांनी सुध्दा निसर्गाला कुठेही इजा पोहोचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत वाढते प्रदूषण व भीषण पाणी टंचाई सर्वांसाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.त्यामुळे होळी हा सण साजरा करतांना पर्यावरणाशी निगडित असावा जेणेकरून निसर्गाला इजा पोहोचणार नाही.कारण होळी या सणाला लाकुड,पाणी यांचा वापर जास्त होतो आणि या दोन्ही गोष्टी पर्यावरणाशी अत्यंत निगडित आहेत. होळीला दरवर्षी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. त्यामुळे होळी या सणाला पाण्याचा वापर कमी करावा व पर्यावरणातील वाढते प्रदूषण पहाता स्वच्छतेकडे सर्वांनीच जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करावे.देशात आणि जगात पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे आणि वाढणार सुध्दा आहे.त्यामुळे होळीच्या सणाला पाण्याचा वापर टाळावा व पाणी वाचविण्याचा संकल्प सर्वांनीच करावा.उष्णतेचे वादळ आणि पाण्याचा हा!हा!कार यामुळे मानव व पशुपक्षी नेहमीच भरडत असतो आणि भरडत आहे.वाढती लोकसंख्या यामुळे मानवाने भुभावर पुर्णतः अतिक्रमण केल्याचे दिसून येते.देशात होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केल्या जातो.होळीच्या दीवशी गुलाल, रंग,वारीस इत्यादीसह केमिकल युक्त रंगाचा वापर होतांना आपण पहात असतो.यामुळे डोळ्यांना व चेहऱ्याला इजा होऊ शकते यापासून सावध राहण्याची गरज आहे.रंग खेळताना कोणीही हा विचार करत नाही की पाण्याचा व्यत्यय कीती होतो. होळी या सणाला दरवर्षी लाखो लिटर पाणी वाया जात असते आणि पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळ्यात पाण्यासाठी सर्वांनाच वणवण भटकावे लागते.आजही देशासह महाराष्ट्रात पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दीसते व याचा परिणाम शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भोगावा लागतो.आजच्या परीस्थितीत हवामान खाते सांगत आहे की यावर्षी उन्हाळा नेहमीपेक्षा जास्त तापणार आहे. यावरून आपण समजू शकतो की पाण्याची समस्या कमी न होता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.त्यामुळे आज पाण्याचा एक एक थेंब वाचवीण्याकरीता मानवाने चुरशीचे प्रयत्न केले पाहिजे. होळीचा सण हा पाच दिवस म्हणजेच पंचमी पर्यंत चालतो. त्यामुळे या काळात पाण्याचा वापर जास्तीत जास्त टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे देशात अवैधरित्या जंगल तोडीमुळे लाकडांची कमतरता पहाता होळी दहणाकरीता कमीत कमी लाकडांचा उपयोग केला पाहिजे किंवा होळी दहनाकरीता गोअरीचा (काउडंग) चा वापर जास्त करावा यामुळे पर्यावरणात सुगंध निर्माण होईल.देशात आणि जगात पाण्याची समस्या पहाता फक्त देशी गुलाल किंवा फुलांचा वापर करून होळी या महत्त्वपूर्ण सनाचा आनंद घ्यावा. आज पाण्याच्या भरोशावरच मनुष्य,पशुपक्षी,अन्न-धान्य, संपूर्ण जीवसृष्टी,जंगल हे सर्व पाण्यावरच अवलंबून असते.पाणी हे सोनसमजा आणि होळीला फक्त गुलाल किंवा फुलांचा वापर करून होळीचा सण साजरा करावा.ज्या प्रमाणे मानवाला अन्न,वस्त्र, निवारा या गोष्टीची गरज आहे त्याचप्रमाणे आज संपूर्ण जिवसृष्टीला व पृथ्वीला पाण्याची नितांत गरज आहे.जंगल तोडीमुळे निसर्गाचे संतुलन विस्कळीत झाले आहे.त्यामुळे आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या,अस्वल) इत्यादी अनेक प्राणी जंगलातून गावात व शहरात शिरकाव करतांना दिसते.कारण मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जंगल संपदेवर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. त्यामुळे जंगलातील प्राणी शहरात येत नसुन आपण जंगलाकडे आगेकूच(अतिक्रमण) करीत आहोत. त्यामुळे होळी करीता कमीत कमी लाकडांचा वापर केला पाहिजे. त्याचप्रमाणे होळीच्या निमित्ताने अवैध वृक्षतोड होण्याची शक्यता असते ती ताबडतोब थांबवली पाहिजे.आता वाढत्या कारखान्यांमुळे आणि परमाणु परीक्षण,शस्त्रस्पर्धा आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे होळीला पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे.भारतासह संपूर्ण जगभर २२ मार्चला जागतीक जल दीनपाळला जातो याची कृती होळीच्या सणा पासुन करावी व पाणी वाचवावे.कारण पाणी हे निसर्गाचे अनमोल रत्नआहे. त्याला वाचवीण्याचा प्रयत्न सर्वांनीच सर्व स्तरातून केला पाहिजे.इतर देशांप्रमाणे भारतसुध्दा पाण्याच्या बाबतीत रेडलाईट झोनमध्ये आहे. त्यामुळे भारतसुध्दा पाणी टंचाईच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते.त्यामुळे होळीचे औचित्य साधून प्रत्येकांनी आपल्या परीसरात एक-एक झाड लावुन निसर्गाला पुनरूज्जीवीत केले पाहिजे व सर्वांनीच पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. यातच खऱ्याअर्थाने होळी व धुलीवंदन दीसुन येईल.त्यामुळे जान है तो जहान है हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारून पुढचे पाऊल टाकायला पाहिजे.करोना महामारीने मानवजातीला बरेच काही शिकवीले.त्याचे अनुकरण करून प्रत्येकांनी स्वतःच्या प्रकृतीची काळजी स्वतःच घेतली पाहिजे. होळी उत्सवात उन्माद नको! हुल्लडबाजी नको परंतु आनंद भरपूर घ्यावा. यामुळे सर्वांचेच जीवन सुरक्षित रहाण्यास मोठी मदत मिळेल. कारण आपण सुरक्षित तर निसर्ग सुरक्षित, निसर्ग सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित, संपूर्ण जीव सृष्टी सुरक्षित तर जग सुरक्षित.यासाठी होळीच्या महत्वपूर्ण सणाचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे. यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल व पर्यावरण सुधारण्यास मोठी मदत होईल आणि होळी या सणाचे महत्त्व संपूर्ण जगात निसर्ग वाचविण्याच्या दृष्टीकोनातून चांगला संदेश जगभर पसरेल.जय हिंद.

**-लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# महायुद्धाचा भडका!

पान १ वरून..

**कतार:** अल-उदेद हवाई तळ.

**कुवेत:** अल-सलेम हवाई तळ.

**युएई:** अल-धफ्रा हवाई तळ (दुबई आणि अबू धाबीमध्येही शक्तिशाली स्फोट).

**बहरीन:** अमेरिकेचा पाचवा ताफा (5th Fleet) असलेल्या तळावर हल्ला.

**जागतिक हवाई वाहतूक ठप्प; आखाती देशांत भीतीचे सावट**

या भीषण युद्धामुळे मध्य पूर्वेतील हवाई क्षेत्र युद्धभूमी बनले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव अनेक देशांनी आपली सीमा आणि हवाई क्षेत्र बंद केले आहे.

**उड्डाणे रद्द:** लुफ्थांसा, केएलएम, विझ एअर आणि रशियन एअरलाईन्सनी इस्रायल, दुबई, तेल अवीव आणि तेहरानची सर्व उड्डाणे ७ मार्चपर्यंत रद्द केली आहेत.

इराक आणि कुवेत: या देशांनी सर्व येणारी-जाणारी विमाने थांबवली आहेत.

**हुथी बंडखोरांच्या उड्या: इस्रायलवर नव्या हल्ल्यांची तयारी**

येमेनमधील इराण समर्थित हुथी बंडखोरांनी या युद्धात उडी घेण्याची घोषणा केली आहे. आज रात्रीपासून इस्रायल आणि लाल समुद्रातील जहाजांवर भीषण हल्ले सुरू होतील, असा इशारा हुथी नेत्यांनी दिला आहे. यामुळे सागरी व्यापारावरही मोठे संकट ओढवण्याची शक्यता आहे.

स्थितीचा सारांश: सध्या संपूर्ण आखाती देश युद्धाच्या छायेत आहेत. अमेरिकेचा थेट सहभाग आणि इराणचा आक्रमक प्रतिसाद पाहता, हे युद्ध तिसऱ्या महायुद्धाचे रूप धारण करणार का? अशी भीती व्यक्त होत आहे.

# संजय राऊतांनी मुख्यमंत्र्यांची माफी मागावी, अन्यथा कायदेशीर कारवाई; भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांचा इशारा

मुंबई: संजय राऊत सातत्याने बिनबुडाचे आरोप करत असून, त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या खोट्या आरोपाबद्दल जाहीर माफी मागावी, अन्यथा भाजप त्यांना कायदेशीर नोटीस बजावेल, असा इशारा भाजपचे मुख्य प्रदेश प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी दिला.

व्हीएसआर कंपनीचे विमान फडणवीसांच्या मालकीचे असल्याचा आरोप राऊतांनी केला होता. यावर पलटवार करताना बन म्हणाले की, मुख्यमंत्री हे उद्धव ठाकरे नाहीत की ज्यांच्या दिमतीला सतत खासगी विमाने असावीत. राऊतांनी आधी ठाकरेंच्या विमानांचा हिशोब द्यावा.

तपास यंत्रणांच्या मुद्द्यावरूनही त्यांनी राऊतांना लक्ष्य केले. केजरीवाल यांच्या सुटकेचे उदाहरण देत ते म्हणाले की, सोयीनुसार तपास यंत्रणांना कधी दबावाखाली तर कधी स्वायत्त म्हणणारी 'डबल ढोलकी' राऊतांनी बंद करावी. पत्राचाळ घोटाळ्यावरून राऊतांनी स्वतःचे आत्मपरीक्षण करावे, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

**फॉर्म ए.आर.४**

दैनिक '**आत्ताच एक्सप्रेस**' प्रकाशनासंबंधीचे नियम ७ नुसार निवेदन

१) प्रकाशन स्थान : पी-३० गुलमोहर कॉलनी एन-५ ,सिडको छत्रपती संभाजीनगर -४३१००३

२) प्रकाशन काळ : दैनिक

३) मुद्रकाचे नांव भारतीय नागरिक आहे काय ?: सुग्रीव सोपानराव मुंढे : होय (भारतीय)

४) प्रकाशकाचे नाव भारतीय नागरिक आहे काय? सुग्रीव सोपानराव मुंढे : होय (भारतीय)

५) संपादकाचे नांव भारतीय नागरिक आहे काय? सुग्रीव सोपानराव मुंढे : होय (भारतीय)

६) मालकी : सुग्रीव सोपानराव मुंढे

७) एकूण भांडवलाच्या एक टक्क्याहून अधिक भाग असलेल्या भागधारकांची नावे व पत्ते : काही नाही.

मी, **सुग्रीव सोपानराव मुंढे** असे जाहिर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे आणि समजुतीप्रमाणे सत्य आहे.

दि. १ मार्च २०२६

**सही/-**
**सुग्रीव सोपानराव मुंढे**
**प्रकाशक**

# प्रशासनाचा 'बुलडोझर' फक्त गरिबांवरच?

## पैठणमध्ये उच्चभ्रूंच्या अनधिकृत वाहनतळाकडे नगर परिषदेचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/प्रतिनिधी/बबन उदावंत/** आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या नाथ षष्ठी यात्रेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, एकीकडे लाखो भाविकांच्या स्वागतासाठी सज्जतेचा दावा करणारे नगर परिषद प्रशासन दुसरीकडे शहरातील धनदांडग्यांच्या अतिक्रमणासमोर नतमस्तक झाल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

**पालखी ओट्यालाच बनवले 'खाजगी पार्किंग'**

ज्या गागा भट्ट चौकातील संत एकनाथ महाराज पालखी ओट्यावर नाथांच्या पालखीचा विसावा होतो आणि जिथून खऱ्या अर्थाने नाथ षष्ठी सोहळ्याचा प्रारंभ होतो, त्याच पवित्र परिसराला आज एका अनधिकृत वाहनतळाचे स्वरूप आले आहे. शहरातील काही उच्चभ्रू नागरिकांनी आपल्या खाजगी गाड्या लावण्यासाठी या ओट्याच्या परिसरावरच अतिक्रमण केले आहे. प्रशासनाच्या नाकाखाली हा प्रकार सुरू असतानाही अधिकारी मूग गिळून गप्प का, असा सवाल उपस्थित होत आहे.

**प्रशासनाची दुटप्पी भूमिका: गरिबांना हटवले, धनदांडग्यांना मोकळे रान!**

गेल्या महिन्याभरापासून नगर परिषद प्रशासनाने शहरातील मुख्य रस्ते आणि चौकातील अतिक्रमणे काढण्याचा धडाका लावला आहे.

अनेक छोट्या व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहाची साधने बुलडोझर लावून उद्ध्वस्त करण्यात आली. मात्र, चक्क नगर परिषद कार्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावरच असलेल्या पालखी ओट्यावरील हे 'हाय-प्रोफाईल' अतिक्रमण प्रशासनाला दिसत नाही का? की हे अतिक्रमण काढायला प्रशासनाचे हात कोणाच्या दबावामुळे थरथरत आहेत?

**- स्वच्छतेचा पत्ता नाही, अस्वच्छतेचे साम्राज्य.**

**- नाथ षष्ठी अवघ्या १५ दिवसांवर येऊन ठेपली आहे. तरीही:पालखी ओट्याची अजूनही साफसफाई झालेली नाही.**






**-रंगरंगोटीचे काम रखडलेले आहे.**

**- परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे.**

तुकाराम बीजेच्या दिवशी नाथांची पालखी याच ओट्यावर विसावते. वारकरी आणि भाविकांसाठी हे श्रद्धेचे स्थान आहे. मात्र, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या पवित्र जागेचा वापर पार्किंगसाठी होत असणे, हे दुर्दैवी आहे.

**- स्थानिक भाविकांकडून संताप व्यक्त.**

वारकरी संप्रदायातून संतापाची लाट

प्रशासनाने जर तातडीने हे अनधिकृत वाहनतळ हटवून पालखी ओट्याची स्वच्छता केली नाही, तर आगामी सोहळ्यात भाविकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा दिला जात आहे. 'सर्वसामान्य नागरिकांच्या अतिक्रमणावर छाती फुगवून कारवाई करणाऱ्या प्रशासनाने आता या धनदांडग्यांच्या गाड्यांवर कारवाई करून आपली हिंमत दाखवावी', असे खुले आव्हान आता पैठणकर देऊ लागले आहेत.

---

# मद्यधुंद तरुणांचा गोळीबार अन् संतापलेल्या ३०० गावकऱ्यांचा थरार; कला केंद्राची रणभूमी!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/ प्रतिनिधी/** जिल्ह्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचे वाभाडे काढणारी एक अत्यंत धक्कादायक घटना शनिवारी रात्री पैठण तालुक्यातील थापटी तांडा येथे घडली. कुलस्वामिनी कला केंद्राबाहेर मद्यधुंद तरुणांनी घातलेला धिंगाणा, एका तरुणाला झालेली बेदम मारहाण आणि त्यानंतर झालेला गोळीबार यामुळे संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. या घटनेचा बदला घेण्यासाठी रजापूरच्या तब्बल ३०० गावकऱ्यांनी कला केंद्रावर धाड टाकत जोरदार तोडफोड केली, ज्यामुळे या भागाला छावणीचे स्वरूप आले आहे.

**छत्रपती संभाजीनगर हादरले!**



शनिवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास थापटी तांडा येथील 'कुलस्वामिनी कला केंद्रा'बाहेर काही मद्यधुंद तरुण हुल्लडबाजी करत होते. यावेळी रस्त्याने जाणाऱ्या रजापूर येथील एका निष्पाप तरुणाला या गुंडांनी विनाकारण अडवले. क्षुल्लक कारणावरून हुज्जत घालत त्यांनी या तरुणाला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.

इतक्यावरच न थांबता, या मद्यधुंद टोळीतील एकाने थेट आपल्या खिशातून बंदूक काढली आणि हवेत गोळीबार केला. गोळीबाराच्या आवाजाने परिसरात एकच खळबळ उडाली आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले.

**गाव पेटून उठलं: ३०० जणांचा 'फिल्मी' स्टाईल हल्ला**

आपल्या गावातील तरुणाला मारहाण आणि गोळीबार झाल्याची बातमी वाऱ्यासारखी रजापूर गावात पोहोचली. या अन्यायाविरुद्ध गावकरी एकवटले आणि काही वेळातच ३०० हून अधिक गावकऱ्यांचा संतापलेला जमाव थेट कला केंद्राकडे रवाना झाला.

**रणकंदन:** जमावाने कला केंद्राचा लोखंडी दरवाजा उखडून आत प्रवेश केला.

**तोडफोड:** समोर येईल त्या वस्तूची गावकऱ्यांनी नासधूस केली. फर्निचर, सीसीटीव्ही कॅमेरे, टेबल आणि विजेची उपकरणे अक्षरशः फोडून काढली.

**वाहनांचे नुकसान:** पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या १० ते १२ गाड्यांच्या काचा फोडून त्या चक्काचूर करण्यात आल्या. या हल्ल्यात कला केंद्राचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

**आत डान्स सुरू, बाहेर दगडफेक!**

ज्यावेळी हा हल्ला झाला, तेव्हा कला केंद्रात डान्सचा कार्यक्रम रंगात आला होता आणि प्रेक्षकांची मोठी गर्दी होती. अचानक झालेल्या दगडफेकीमुळे प्रेक्षकांची पाचावर धारण बसली. जीव वाचवण्यासाठी अनेकांनी सैरावैरा धाव घेतली. या संपूर्ण गोंधळात आणि दगडफेकीत ३ ते ४ जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

पोलिसांचा मोठा बंदोबस्त

घटनेची भीषणता लक्षात घेताच पाचोड पोलिसांनी तातडीने अतिरिक्त कुमक घेऊन घटनास्थळ गाठले. पोलिसांनी बळाचा वापर करत जमावाला पांगवले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. सध्या रजापूर आणि परिसरात मोठी तणावाची स्थिती असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.गुंडांच्या दहशतीला गावकऱ्यांनी दिलेलं हे चोख प्रत्युत्तर असल्याची चर्चा परिसरात आहे, मात्र या गोळीबारामुळे जिल्ह्यातील अवैध शस्त्रांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

---

# चिंचोली लिंबाजी येथील छत्रपती विद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात साजरा

**विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक कल्पकतेचे मान्यवरांकडून कौतुक**

**आत्ताच एक्सप्रेस**

**चिंचोली लिंबाजी (प्रतिनिधी)** स्थानिक छत्रपती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चिंचोली लिंबाजी येथे २८ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' मोठ्या उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा आणि त्यांच्यातील सुप्त गुण कळावेत, या उद्देशाने शाळेत भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी शिक्षणाधिकारी डॉ. टी. पी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कला व विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या अनिता खंडागळे, विक्रमसिंह पवार, पुरुषोत्तम मनगटे, विद्यालयाचे मुख्याध्यापक योगेश काथार आणि प्रवीण पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांच्या प्रयोगांनी वेधले लक्ष:

विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली विविध वैज्ञानिक मॉडेल्स, नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि प्रात्यक्षिके सादर केली. यामध्ये पर्यावरण संवर्धन, सौर ऊर्जा, जलव्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञान अशा विविध विषयांवर आधारित प्रकल्पांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून साकारलेल्या या प्रयोगांद्वारे त्यांच्यातील संशोधन वृत्तीचा परिचय दिला.

विज्ञानामुळे सत्यता पडताळून पाहण्याची संधी - डॉ. पाटील:

उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांच्या प्रयोगांची पाहणी करताना डॉ. टी. पी. पाटील यांनी मुलांचे कौतुक केले व त्यांना प्रोत्साहित केले. आपल्या भाषणात ते म्हणाले की, विज्ञानामुळे मानवाला प्रत्येक गोष्टीची सत्यता पडताळून पाहण्याची संधी मिळते. नवीन विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळेच देशाच्या प्रगतीला खऱ्या अर्थाने हातभार लागतो. तसेच, शिक्षकांनी विज्ञान हा विषय केवळ पुस्तकी न ठेवता विविध प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजावून सांगावा, जेणेकरून विद्यार्थ्यांची विज्ञानातील गोडी वाढेल, असे मतही त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन प्रीती उघडे यांनी केले. एकूणच सर्व मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

---

# छत्रपती संभाजीनगर मनपा क्रीडा महोत्सवाची दिमाखदार सांगता

**बनेवाडी शाळेचे वर्चस्व, तर प्रियदर्शनी शाळेची 'षटकार' कामगिरी!**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या मनपा क्रीडा महोत्सवाचा समारोप शनिवारी विभागीय क्रीडा संकुल येथे उत्साहात पार पडला. आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या महोत्सवात बनेवाडी केंद्रीय प्राथमिक शाळेने उत्कृष्ट सांघिक प्रदर्शन केले, तर प्रियदर्शनी शाळेने विविध गटांत तब्बल सहा चषक पटकावून आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले.

**दिग्गज खेळाडूंच्या उपस्थितीत सोहळा**

या महोत्सवाचे उद्घाटन महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते झाले होते. बक्षीस वितरण समारंभाला भारतीय हॉकीचे दिग्गज, पद्मश्री धनराज पिल्ले यांची विशेष उपस्थिती होती. त्यांच्यासह आयुक्त जी. श्रीकांत, क्रीडा अधिकारी संजीव बालया, ज्ञानदेव सांगळे, खंडेराव यादवराव आणि इतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना मेडल आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानदेव सांगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन क्रीडा प्रशिक्षक सागर मगरे यांनी केले.

खेळांमधील चुरस आणि निकाल

दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील आणि १७ वर्षांखालील अशा दोन गटांत मुले व मुलींच्या स्वतंत्र स्पर्धा पार पडल्या. एकूण ८ क्रीडा प्रकारांचा यात समावेश होता.

१. क्रिकेट (मुले)

१४ वर्षांखालील: मनपा केंद्रीय शाळा किराडपुरा नं. १ (विजेता), बनेवाडी शाळा (उपविजेता).

१७ वर्षांखालील: बायजीपुरा शाळा (विजेता), किराडपुरा नं. १ (उपविजेता).

२. रस्सीखेच (प्रियदर्शनी शाळेचे वर्चस्व)

१४ वर्षांखालील (मुली): प्रियदर्शनी शाळा (विजेता), मुकुंदवाडी (उपविजेता).



१४ वर्षांखालील (मुले): प्रियदर्शनी शाळा (विजेता), बन्सीलाल नगर (उपविजेता).

१७ वर्षांखालील: मुले गटात हर्सूल, तर मुलींच्या गटात बेगमपुरा शाळेने विजेतेपद पटकावले.

३. खो-खो

१४ वर्षांखालील: मुले गटात मुकुंदवाडी प्रथम, तर मुलींत हर्सूल शाळा प्रथम.

१७ वर्षांखालील: मुले गटात बनेवाडी शाळेने प्रथम क्रमांक पटकावला, तर मुलींत बेगमपुरा शाळा अव्वल ठरली.

४. वैयक्तिक स्पर्धा (अथलेटिक्स)

१०० मीटर धावणे: १४ वर्षांखालील मुलींत प्रणाली कुलकर्णी आणि मुलांत रवी कुमार यांनी सुवर्णपदक जिंकले. १७ वर्षांखालील गटात निकिता गायकवाड आणि गौरव देहाडे यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

गोळा फेक: १४ वर्षांखालील गटात समीर शेख व श्रावणी नरवडे यांनी बाजी मारली. १७ वर्षांखालील गटात अशोक आणि सायमा शेख प्रथम आले.जम्प रोप: आलीजा, प्रज्वल, मशिरा मोहम्मद आणि गौतम गायकवाड यांनी आपापल्या गटात सुवर्ण यश संपादन केले.

'बनेवाडी' आणि 'हर्सूल' केंद्रांची चमकदार कामगिरी

सांघिक कामगिरीचा विचार करता मनपा केंद्रीय प्राथमिक विद्यालय बनेवाडी या केंद्राने सर्वांत प्रभावी प्रदर्शन केले. त्यापाठोपाठ हर्सूल केंद्र आणि किराडपुरा नंबर १ च्या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याने उपस्थितांची मने जिंकली.दीपक सपकाळ, संतोष अवचार, सागर तांबे, रोहन पागोरे आणि स्वप्नील गुडेकर यांनी या स्पर्धेत पंच म्हणून चोख जबाबदारी पार पाडली. महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी हा महोत्सव एक मैलाचा दगड ठरला आहे.

---

# पतीचा खोटा दावा आणि न्यायालयाचा हस्तक्षेप

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** या प्रकरणातील याचिकाकर्ती पत्नी अर्शी परवीन यांनी कौटुंबिक न्यायालयात पोटगीसाठी अर्ज केला होता. सुरुवातीला कौटुंबिक न्यायालयाने त्यांना केवळ २,५०० प्रति महिना अंतरिम पोटगी मंजूर केली होती. मात्र, ही रक्कम अत्यंत तुटपुंजी असल्याने त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली.

पतीचा दावा: पतीचे म्हणणे होते की तो एका स्वयंसेवी संस्थेत काम करतो आणि त्याला दरमहा केवळ १०,००० उत्पन्न मिळते.पत्नीचा युक्तिवाद: पत्नीने न्यायालयात सिद्ध केले की तिचा पती पदवीधर असून तो शिक्षक म्हणून काम करतो, तसेच इतर मार्गांनीही त्याला चांगले उत्पन्न मिळते.

पुरावे लपवणे: पतीने न्यायालयासमोर आपले संपूर्ण बँक स्टेटमेंट सादर न करता केवळ काही भागांचे तपशील दिले होते, ज्यावरून त्याने उत्पन्न लपवल्याचे स्पष्ट झाले.

किमान वेतनाचा आधार: न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

न्यायमूर्ती डॉ. स्वरणा कांता शर्मा यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी करताना पतीचा १०,००० उत्पन्नाचा दावा पूर्णपणे फेटाळून लावला. न्यायालयाने खालील निरीक्षणे नोंदवली:

**कुशल कामगाराचे निकष:** पती पदवीधर आहे. उत्तर प्रदेशातील नियमांनुसार, एका 'कुशल कामगाराचे' किमान वेतन अंदाजे १३,२०० आहे. पतीचे कथित उत्पन्न या किमान वेतनापेक्षाही कमी असणे तार्किकदृष्ट्या चुकीचे आहे.

**उत्पन्नाचे गृहीतक:** पती काम करण्यास सक्षम आणि सुशिक्षित असल्याने, त्याचे किमान उत्पन्न उत्तर प्रदेशच्या वेतन दराप्रमाणे १३,२००/- मानले जावे.

**पोटगीत वाढ:** या सुधारित उत्पन्नाच्या आधारावर न्यायालयाने पत्नीची पोटगी २,५०० वरून ३,५०० प्रति महिना केली. ही रक्कम अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून लागू करण्याचे आदेश दिले आहेत.

या निकालावर भाष्य करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धन्नावत यांनी म्हटले की, हा निकाल कौटुंबिक हिंसाचार आणि पोटगीच्या प्रकरणांमध्ये महिलांना बळ देणारा आहे. अनेकदा पती आपली मालमत्ता किंवा उत्पन्न लपवून पत्नीला हक्कापासून वंचित ठेवतात. किमान वेतनाचा आधार घेण्याचा हा निर्णय देशभरातील न्यायालयांसाठी एक वस्तुपाठ ठरेल.

पारदर्शकता: पतींना आता आपली खरी कमाई लपवणे कठीण होईल.

सन्मानाने जगण्याच अधिकार: महिलांना आर्थिक आधार मिळण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरेल.

शिक्षणाची किंमत: पती सुशिक्षित असेल, तर तो 'उत्पन्न नाही' असे सांगून आपली जबाबदारी झटकू शकत नाही.

दिल्ली उच्च न्यायालयाचा हा निकाल स्पष्ट करतो की, पतीचे नेमके उत्पन्न समजत नसेल, तरीही त्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार आणि सरकारी किमान वेतन नियमांनुसार त्याला पत्नीला पोटगी द्यावीच लागेल.

---

# कर्तव्यपूर्तीचा सन्मान: छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलातील चार अधिकारी सेवानिवृत्त

**सजविलेल्या वाहनातून भावपूर्ण निरोप**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** पोलीस दलातील सेवा ही केवळ एक नोकरी नसून, ते अहोरात्र चालणारे एक पवित्र कर्तव्य आहे. आयुष्यातील उमेदीची ३० ते ३५ वर्षे समाजाच्या सुरक्षिततेसाठी अर्पण केल्यानंतर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलातील चार अधिकारी आज वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने पोलीस अधीक्षक कार्यालयात एका विशेष आणि भावूक गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.










प्रमुख उपस्थिती आणि सत्कार

हा सोहळा पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड व अपर पोलीस अधीक्षक मा. अन्नपूर्णा सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांचा त्यांच्या जीवनसाथी आणि कुटुंबासह शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

सेवानिवृत्त झालेले अधिकारी:

सुखदेव धोंडिराम लोखंडे (श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, वाहतूक शाखा),दिगंबर मुरलीधर पेरके (श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. करमाड),विजय बाबुराव पाटील (श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, पो. स्टे. अजिंठा),श्रीमती सुनीता अशोक लखमल (मपोहेकॉ, नियंत्रण कक्ष),

आता सण घरी साजरे होतील: पाल्यांचे हळवे मनोगत

कार्यक्रमादरम्यान सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या मुलांनी व्यक्त केलेले मनोगत उपस्थितांच्या काळजाला स्पर्श करून गेले. एका पाल्याने आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की,वडिलांच्या कर्तव्यामुळे आजवर अनेक सण-उत्सव आम्ही त्यांच्याविना साजरे केले. समाज सुरक्षित राहावा म्हणून त्यांनी स्वतःच्या कुटुंबाला नेहमी दुय्यम स्थान दिले. पण आज ते सर्व जबाबदाऱ्या पार पाडून सन्मानाने घरी येत आहेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आता इथून पुढचे सर्व सण आम्ही एकत्र साजरे करू शकू.

मार्गदर्शन करताना डॉ. विनयकुमार राठोड यांनी अधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, या अधिकाऱ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, सण-उत्सवांची पर्वा न करता प्रामाणिकपणे सेवा बजावली आहे. तपासातील त्यांचे कौशल्य आणि शिस्त ही नवीन पिढीसाठी आदर्श आहे. जरी ते आज गणवेशातून निवृत्त होत असले, तरी पोलीस दल हे त्यांचे कुटुंब आहे आणि प्रशासन सदैव त्यांच्या पाठीशी राहील.

तसेच त्यांनी निवृत्त अधिकाऱ्यांना उर्वरित आयुष्यात आरोग्याची काळजी घेण्याचे व कुटुंबाला पुरेसा वेळ देण्याचे आवाहन केले.

सजविलेल्या वाहनांतून निरोप: एक अनोखा उपक्रम

सोहळ्याचा समारोप अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने झाला. पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेतून, सर्व सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना त्यांच्या कुटुंबासह मानाने घरी पोहोचवण्यासाठी फुलांनी व शुभेच्छा फलकांनी सजविलेली विशेष पोलीस वाहने उपलब्ध करून देण्यात आली होती. पोलीस अधीक्षक व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः या वाहनांना हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ केले.या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी पोलीस उपअधीक्षक (गृह) श्री. गौतम पातारे, आर.पी.आय. अण्णासाहेब वाघमोडे, पोलीस निरीक्षक (कल्याण) प्रशांत महाजन, पोलीस निरीक्षक (MT) संतोष वायचळ व इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक आत्ताच एक्सप्रेसः बातमीचा डंका!

# होळीच्या तोंडावर राज्य उत्पादन शुल्काचा 'धडाका'; बनावट आणि गोवा बनावटीच्या मद्याचा अड्डा उध्वस्त!

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर (प्रतिनिधी)** येणाऱ्या होळी आणि धुलिवंदन सणाच्या पार्श्वभूमीवर राज्यात शांतता राखण्यासाठी आणि अवैध मद्यविक्रीला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कंबर कसली आहे. दि. २७/०२/२०२६ रोजी जालना जिल्ह्यातील पिंपळी धामणगाव येथे धाडसी कारवाई करत एका मोठ्या मद्य तस्करीचा पर्दाफाश करण्यात आला आहे.

**राजेश लोखंडे जेरबंद, लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त!**

**गुप्तहेर कामाला लागले, अन तस्कराचा खेळ खल्लास!**

राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या एका पक्क्या गुप्त माहितीनुसार, पिंपळी धामणगाव (ता. परतूर) येथील राजेश चत्रभुज लोखंडे (वय २५) हा तरुण आपल्या घरात गोवा बनावटीच्या आणि महाराष्ट्र राज्यात बंदी असलेल्या विदेशी मद्याचा साठा करून तो अवैधपणे विकत असल्याची खात्री झाली होती. माहिती मिळताच निरीक्षक प्रविण भि. ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने लोखंडे याच्या घरावर छापा टाकला आणि अधिकाऱ्यांचे डोळेच पांढरे झाले.

**मुद्देमाल पाहून पोलीसही चक्रावले!**

तपासणी दरम्यान आरोपीच्या घरातून केवळ गोवा बनावटीचे मद्यच नाही, तर बनावट दारू तयार करण्याचे साहित्यही मोठ्या प्रमाणात सापडले आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.डॉ. ड ॅ न




चॉईस माल्ट व्हिस्की (गोवा बनावट): ७५० मि.ली. च्या ३६ सीलबंद बाटल्या,रॉयल स्टॅग व्हिस्की (प्रथम दर्शनी बनावट): १८० मि.ली. च्या ३० सीलबंद बाटल्या,देशी दारू भिंगरी संत्रा (बनावट): १८० मि.ली.च्या १४४ सीलबंद बाटल्या,रिकाम्या बाटल्यांचा खचः रॉयल स्टॅग आणि इम्पीरियल ब्ल्युच्या तब्बल ३९० रिकाम्या बाटल्या आणि त्यांचे बुचे जप्त करण्यात आली आहेत.एकूण २८,५८५/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, यावरून या ठिकाणी बनावट दारू भरण्याचे मोठे रॅकेट असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



**कायद्याचा बडगाः गुन्हेगारांचे धाबे दणाणले!**

या प्रकरणी आरोपी राजेश लोखंडे विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (अ, ब, ड, इ, फ) सह कलम ८०, ८१, ८३, ८६ आणि १०८ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध मद्य तस्करांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.ही धडाकेबाज कारवाई आयुक्त डॉ. राजेश देशमुख, विभागीय उपआयुक्त संगिता दरेकर आणि जालना जिल्ह्याच्या अधीक्षक श्रीमती ज्ञानेश्वरी आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात निरीक्षक प्रविण ठाकूर, संजय ताकवाले, सुमित फावडे, भरत दौंड, अंकुश बिजुले, दिपाली उफाड आणि इतर जवानांचा समावेश होता.

जनतेला आवाहन:

अवैध मद्य निर्मिती किंवा विक्रीबाबत काहीही माहिती असल्यास प्रशासनाच्या टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ वर संपर्क साधण्याचे आवाहन निरीक्षक प्रविण ठाकूर यांनी केले आहे.

आत्ताच एक्सप्रेस विशेष: राज्यात महसूल बुडवून लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा तस्करांना आता जेलची हवा खावीच लागणार!

महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता सा. बां. विद्युत विभाग छत्रपती संभाजी नगर**

**ई-निविदा सुचना क्र. ३१ सन - २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, औरंगाबाद सा. बां. विद्युत विभाग, ब-१ टक्केवारीच्या ई-प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येत आहेत. को-या निविदा नमुना http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. ०२.०३.२०२६ वेळ १०.०० ते दि ०९.०३.२०२६ वेळ १७.३० पर्यंत ऑनलाईन डाऊनलोड करण्याकरीता उपलब्ध होतील.

टिप :- सदर निविदा सुचनेमध्ये ०१ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

जा.क्र. काअ/औविवि/निविदा/ ६२५/२०२५
दि. २३/२/२०२६

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विद्युत विभाग छत्रपती संभाजी नगर**

# जालन्यात सत्तेची 'धुळवड' सुरूच

## महापौर-उपमहापौर आले, पण धुळखाणारी मशीन अद्यापही कोमातच!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी** / जालना शहराला धुळीच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी लाखो रुपये खर्च करून खरेदी करण्यात आलेली 'डस्ट क्लीनिंग मशीन' (धुळ ओढण्याचे यंत्र) गेल्या अनेक दिवसांपासून महानगरपालिकेच्या आवारात धूळ खात पडली आहे. विशेष म्हणजे, जालना महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक होऊन आता दीड महिना उलटला आहे. नवीन कारभारी आले, जल्लोष झाला, मात्र शहराच्या स्वच्छतेशी संबंधित असलेल्या या महत्त्वाच्या यंत्राला कार्यान्वित करण्यासाठी अद्याप मुहूर्त मिळालेला नाही.




**प्रशासनाचा दिसाळ कारभार की अनास्था?**

शहरातील मुख्य रस्ते आणि अंतर्गत भागांत धुळीचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून श्वसनाचे विकार वाढत आहेत. हीच धूळ साफ करण्यासाठी आधुनिक मशीन आणली गेली. मात्र, ही मशीन रस्त्यावर धावण्याऐवजी मनपाच्या पार्किंगमध्ये **'शोभेची वस्तू'** बनली आहे.

निवडणुकीचा सोहळा संपला, कामाचा कधी? महापौरांच्या निवडीला दीड महिना झाला तरी या विषयावर अद्याप तोडगा निघालेला नाही.

**लाखोंचा खर्च पाण्यातः** जनतेच्या करातून जमा झालेल्या पैशातून घेतलेली ही मशीन वापराविना गंज पकडत आहे.

**आरोग्याशी खेळः** धुळीमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांचे हाल होत असताना प्रशासन कुणाची वाट पाहत आहे? असा सवाल नागरिक विचारत आहेत.

**नेत्यांना फक्त खुर्चीचे सोयरसुतक?**

सत्ता स्थापनेनंतर शहराचा कायापालट करण्याच्या गप्पा मारल्या गेल्या. मात्र, प्रत्यक्षात साधी मशीन सुरू करण्याचे सौजन्यही सत्ताधारी आणि प्रशासनाने दाखवलेले नाही. केवळ फोटो काढण्यापुरतेच नेते मर्यादित आहेत का? अशी संतप्त प्रतिक्रिया जालनेकर व्यक्त करत आहेत.

महानगरपालिकेने तत्काळ याकडे लक्ष देऊन ही मशीन सुरू करावी, अन्यथा शहरातील धुळीचा हा प्रश्न प्रशासनाच्या नाकात दम केल्याशिवाय राहणार नाही.महानगरपालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन ही यंत्रणा तातडीने कार्यान्वित करावी, हीच आता सामान्य जनतेची माफक अपेक्षा आहे.

## भोकरदन येथील गणपती मराठी शाळेत विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

आत्ताच एक्सप्रेस

भोकरदन/प्रतिनिधी/ विज्ञानाची ओढ निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने भोकरदन शहरातील जनविकास शिक्षण संस्था संचलित, श्री. गणपती मराठी शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील विज्ञानावर आधारित विविध प्रयोगांचे सादरीकरण केले.

या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन माजी गटनेते संतोष अन्नदाते यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शहराचे नवनिर्वाचित नगरसेवक रमेश जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मनोज शास्त्री होते.



प्रदर्शनामध्ये इयत्ता तिसरी ते सातवीच्या एकूण २९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये एकूण २० प्रयोगांची मांडणी करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा, जलप्रदूषण, श्वसन संस्था, आणि विद्युत धारेवर आधारित अनेक कल्पक मॉडेल्स सादर केले. पाहुण्यांनी प्रत्येक स्टॉलला भेट देऊन विद्यार्थ्यांकडून प्रयोगांची माहिती जाणून घेतली आणि त्यांच्या कौशल्याचे कौतुक केले.

अशा प्रदर्शनांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजण्यास मदत होते. आजचे विद्यार्थीच उद्याचे शास्त्रज्ञ आहेत, असे प्रतिपादन उद्घाटन प्रसंगी संतोष अन्नदाते यांनी केले.

हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शाळेतील विज्ञान शिक्षिका एस. बी. दळवी आणि डी. ए. पळशीकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. प्रयोगांची निवड करण्यापासून ते त्यांच्या सादरीकरणापर्यंत शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमामुळे प्रदर्शनाचा दर्जा उंचावला होता.यावेळी शाळेतील शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. प्रदर्शनामुळे शालेय परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## संक्षिप्त

### संस्कार प्रबोधिनी विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम; छचचड परीक्षेत १४ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** येथील संस्कार प्रबोधिनी विद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत (छचचड) विद्यालयातील १४ विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले असून, त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

२४ पैकी १४ विद्यार्थी उत्तीर्ण या परीक्षेसाठी विद्यालयाच्या इयत्ता ८ वी मधील एकूण २४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. अत्यंत चुरशीच्या असलेल्या या परीक्षेत विद्यालयातील १४ विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्तीसाठी आपली पात्रता सिद्ध केली आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या परीक्षेत विद्यालयाचा निकाल उत्कृष्ट लागला आहे.

**यशस्वी विद्यार्थ्यांची नामावली**

परीक्षेत यश मिळवणाऱ्या गुणवंतांमध्ये खालील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.श्रीराम रामेश्वर गोडसे,प्रिया शंकर साठेवाड,मानसी अंकुश गायकवाड,सुखदा राजेश कुलकर्णी,शिवप्रसाद अमोल शिवणकर,श्रावणी कृष्णा जोशी,समिक्षा विनोद काळे,सायली ज्ञानेश्वर खरात,प्रथमेश उमेश हेकाडे,ऋषिकेश गजानन मोगल,रुपल संदीप जाधव,योगिराज अरुण वाकोडे,जान्हवी श्याम खुरपे,भक्ती संदीप कापरे विद्यालयाच्या वतीने सत्कार या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यासाठी विद्यालयाच्या वतीने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. शाळेचे शिक्षक, मुख्याध्यापक आणि संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांच्या कष्टाचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे आभार मानले.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, जालना शहराच्या शैक्षणिक वैभवात संस्कार प्रबोधिनी विद्यालयाने मानाचा तुरा रोवला आहे.

## जि.प.शाळा देवहिवरा येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचा जल्लोष

**आत्ताच एक्सप्रेस**

**देवहिवरा (प्रतिनिधी)** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी आणि बहारदार नृत्यांनी उपस्थित पालकांसह ग्रामस्थांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू मोहिते होते. उद्घाटन शिक्षण विस्तार अधिकारी अंकुश राखुंडे, गटसमन्वयक दादाभाऊ जगदाळे, दैनिक सकाळचे पत्रकार सुभाष बिडे, सरपंच परमेश्वर मते, आणि उपसरपंच बाळासाहेब गाडेकर यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी सुदाम जवळकर, भानुदास ठुले यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक राजेंद्र धांडे यांनी शाळेच्या प्रगतीचा आलेख मांडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि गुणवत्तेसाठी आमची शाळा सदैव कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस कलाप्रकार सादर केले. यात प्रामुख्याने ऐतिहासिक व सामाजिक संदेश: छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी गीते.**लोककला व गीतेः** शेतकरी गीते, बालगीते आणि मराठी शाळा गीतांवर आधारित नृत्ये.**मनोरंजनः** साऊथ इंडियन गाणी, बॉलिवूडची प्रसिद्ध गाणी आणि कॉमेडी गीतांनी प्रेक्षकांमध्ये हास्याची कारंजी उडवली.या बालकलाकारांच्या सादरीकरणाला गावातील रसिक नागरिक, माता-भगिनी आणि तरुणांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.विद्यार्थ्यांच्या वेशभूषेसाठी संध्या चाटे व बी. आर. वाघमारे यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक राजेंद्र धांडे व आर. आर. मिसाळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन बी. आर. वाघमारे यांनी मानले.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शरद जवळकर, दीपक रक्ताटे, गणेश जवळकर, सुशील बरडे, गणेश शिंदे, राजेश्वर शेडगे, बाबासाहेब चव्हाण, सचिन जवळकर, बप्पासाहेब जवळकर, सतीश उगले, विजय बरडे, दिगंबर मते, गिराम, हावळे यांच्यासह सर्व ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# अंबडमध्ये महसूलची 'सर्जिकल स्ट्राईक'! वाळू माफियांना दणका, दोन ट्रॅक्टर जप्त अन् गुन्हे दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/अंबड तालुक्यात अवैध वाळू उत्खनन आणि गौण खनिजाची तस्करी करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी महसूल विभागाने आता थेट मैदानात उतरून 'क्शन मोड' धारण केला आहे. जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल आणि तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने धाडसी कारवाई करत दोन ट्रॅक्टर जप्त केले असून, वाळू माफियांमध्ये मोठी खळबळ माजली आहे.



**पहिली कारवाईः बनावट पावत्यांचा 'खेळ' उघड!**

मठ पिंपळगाव येथील दुधना नदी पात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याची गोपनीय माहिती मिळताच तहसीलदार चव्हाण यांनी सापळा रचला. लालवाडी फाटा येथे पथकाने एका विनाक्रमांकाच्या स्वराज ७४४दढ ट्रॅक्टरला घेराव घातला.

**गैरप्रकारः** चालकाने दाखवलेली ई-चलन पावती तपासणीत बनावट आढळली. तसेच वाहनाला अनिवार्य असलेले जीपीएस (त्रझ्रड) यंत्रणाही नव्हती.

**जप्तीः** १ ब्रास वाळूसह तब्बल ७ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**गुन्हेगारः** चालक रईस सय्यद आणि मालक अमोल जिगे (दोघेही रा. मठ पिंपळगाव) यांच्यावर अंबड पोलीस ठाण्यात इछड (२०२३) च्या कडक कलमांसह पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दुसरी कारवाईः** 'वकिल्या' गँगची दादागिरी मोडीत!

दुसरी कारवाई गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. कुख्यात गुंड विलास शिंदे उर्फ वकिल्या याच्या मालकीचा ट्रॅक्टर जप्त करण्यासाठी गेलेल्या महसूल पथकाला काही महिलांनी अडवून अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, गोंदी पोलिसांच्या चोख बंदोबस्तात प्रशासनाने हे वाहन ओढून तहसील कार्यालयात जमा केले. दंडाची रक्कम न भरल्यामुळे ही जप्तीची कारवाई करण्यात आली.

**महसूल आणि पोलीस प्रशासनाचा फौजफाटा**

या धडक मोहिमेत मंडळ अधिकारी सुनील कारामपुरी, कृष्णा हेडके, तलाठी स्वप्नील खरात, विश्वास ढवळे, श्याम विभूते, विकास डोळसे, आणि कोतवाल मनोज उघडे यांनी जीवाची बाजी लावून काम केले. गोंदीचे -झख आशिष खांडेकर यांनी पोलीस बंदोबस्त पुरवत परिस्थिती हाताळली.

आता गय केली जाणार नाही! अवैध गौण खनिज उत्खनन कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. आम्ही केवळ दंडच नाही, तर आता थेट फौजदारी गुन्हे (FIR) दाखल करत आहोत. वाळू चोरी करणाऱ्यांनी वेळीच सावध व्हावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल.


**- विजय चव्हाण, तहसीलदार, अंबड.**

अंबड तालुक्यातील सर्व पोलीस ठाण्यांना अवैध वाहतुकीवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे आगामी काळात वाळू माफिकांचे धाबे आणखी दणाणणार आहेत.

## टेंभुर्णीचे ज्येष्ठ नागरिक ह.भ.प. बाबुराव औटी यांचे निधन; सर्वस्तरांतून शोक व्यक्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**टेंभुर्णी (प्रतिनिधी)** येथील आध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्तिमत्व आणि ज्येष्ठ नागरिक ह.भ.प. बाबुराव बालाजी औटी यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने टेंभुर्णी परिसरात मोठी शोककळा पसरली असून, एका मार्गदर्शक व्यक्तिमत्वाला समाज मुकला असल्याची भावना व्यक्त होत आहे.



अल्पशा आजाराने प्राणज्योत मालवली

मिळालेल्या माहितीनुसार, बाबुराव औटी गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. उपचारादरम्यान शनिवारी सकाळी ११:४५ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची बातमी समजताच टेंभुर्णीसह परिसरातील नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी धाव घेतली.

**विविध क्षेत्रांत कार्यरत कुटुंब**

बाबुराव औटी हे समाजकार्यात नेहमीच अग्रभागी असत. त्यांचे पुत्र मुकुंदराव औटी हे येथील स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्यांचे इतर दोन पुत्र संतोष औटी आणि श्याम औटी हे देखील सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात सक्रिय आहेत. आपल्या मुलांवर उच्च संस्कार करून त्यांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यात बाबुराव यांचा मोठा वाटा होता.

**अंत्यसंस्काराला जनसमुदाय लोटला**

बाबुराव औटी यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, दोन बहिणी, जावई, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रात्री उशिरा येथील जिवरेखा नदीकाठी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील व्यक्तींसह मोठा जनसमुदाय उपस्थित होता. जड अंतःकरणाने त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813